


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ३४, रविवार २२ डिसेंबर २०२४ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

## सरकार कुठेतरी कमी पडतंय!

### मस्साजोग प्रकरणी खा. नीलेश लंके यांची प्रतिक्रिया



■ मस्साजोग येथे देशमुख परिवाराचे सांत्वन केल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी माध्यमांशी संवाद साधला.

बीड : प्रतिनिधी

**बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर सरकारने कोणतेही ठोस पाऊल उचलले नसून सरकार कोठेतरी कमी पडत असल्याची प्रतिक्रिया खा. नीलेश लंके यांनी दिली.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासमवेत खा. नीलेश लंके यांनी मस्साजोग येथे जात देशमुख परिवाराने सांत्वन केले. त्यानंतर पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. खा. बजरंग सोनवणे,आ. राजेश टोपे आ. संदीप क्षिरसागर आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, घटना घडून इतके दिवस लोटले तरी आजूनही सरकारने कोणते ठोस पाऊल उचललेले नाही. याचा अर्थ सरकार कुठेतरी कमी पडत आहे. परभणी, बीडच्या घटना पाहिल्या तर या अतिशय दुर्दैवी घटना घडलेल्या असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, संसदेचे अधिवेशन आटोपून खा. नीलेश लंके हे शुक्रवारी सायंकाळी दिल्लीहून मुंबईत पोहचले. मुंबईहून पुणे येथे मुक्काम करून पुण्याहून ते शरद पवार यांच्यासमवेत मस्साजोग येथे पोहचले.

### तर भुजबळांचे स्वागतच !

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नाराज असलेले आणि मंत्रीमंडळ विस्तारात डावलले गेलेले ज्येष्ठ नेते छगन भुजबळ पुन्हा शरद पवार यांच्याकडे आले तर त्यांचे स्वागतच होईल अशी प्रतिक्रिया खा. लंके यांनी पुण्यात पत्रकारांच्या प्रश्नावर बोलताना दिली. मात्र ते आपल्या संपर्कात नसल्याची पुष्टीही खा लंके यांनी जोडली.

## पळशीच्या आश्रमशाळेचा सावळा गोंधळ विधानसभेत!

### ■ आमदार काशिनाथ दाते यांनी वेधले लक्ष
### ■ चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी

नागपूर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील पळशी येथील आश्रमशाळेचा सावळा गोंधळ अखेर शनिवारी थेट महाराष्ट्राच्या विधानसभेत पोहचला. आमदार काशिनाथ दाते यांनी या आश्रमशाळेतील असुविधांचा पाढा वाचत संबंधित मुख्याध्यापिकांच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत या गंभीर गोष्टींची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. विधिमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आ. काशिनाथ दाते यांनी औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना पळशीच्या आश्रमशाळेतील अनागोंदीकडे सभागृहाचे लक्ष वेधले.**

पळशी येथे ग्रामीण भागातील आदिवासी मुला, मुलींसाठी निवासी आश्रमशाळा असून तिथे इयत्ता दहावीपर्यंतच्या विविध वर्गांमध्ये ३२६ मुले, मुली शिक्षण घेत आहेत. या आश्रमशाळेत दोन-तीन दिवस पाणी उपलब्ध होत नाही. पिण्यासाठी फिल्टरचे पाणी मिळत नाही. खाण्यासाठी आलेले केळी, बटाटा, वांगी, फ्लॉवर हे खराब झालेले असतात हे वेळोवेळी उघडकीस आले आहे. हौदामधील पाण्यामध्ये किडे आढळणे, भाजी व भातामध्ये आळ्या आढळणे, मुदतबाह्य मसाले असणे या बाबींमुळे या आश्रमशाळेतील विद्यार्थी, विद्यार्थीनींचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे दाते यांनी सभागृहाच्या निर्दशनास आणून दिले.



### चांगल्या सुविधा द्या

शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी, विद्यार्थीनींकडे अधिकाऱ्यांसह मुख्याध्यापकांचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे या आश्रमशाळेची चौकशी करून दोषींविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी. या आश्रमशाळेतील विद्यार्थी, विद्यार्थीनींसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

आ. काशिनाथ दाते
विधानसभा सदस्य

### गणित व इतर विषयांचे पाठच शिकविले नाहीत !

दहावी व इतर वर्गांच्या परीक्षा दोन महिन्यांवर आलेल्या असल्या तरी अद्याप गणित व इतर विषयांचे पाठ शिकविले जात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता ढासळलेली असल्याचे आ. दाते यांनी यावेळी बोलताना सांगितले.

### विद्यार्थिनींची सुरक्षितता धोक्यात


आश्रमशाळेत बाहेरचे पुरुष कामगार कार्यरत आहेत. आश्रमशाळेत महिला शिक्षक नसल्याने विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असल्याच्या गंभीर बाबीवर आ. दाते यांनी प्रकाशझोत टाकला.

### त्या मुख्याध्यापिका पुन्हा रूजू झाल्या !

पालकांच्या तक्रारीनंतर संबंधित मुख्याध्यापिकेची बदली झालेली असताना पुन्हा काही दिवसांत त्या पळशी येथे रूजू झाल्या असून मागचे पाढे पन्नास सुरू झाले आहेत. या गंभीर बाबींची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी काशिनाथ दाते यांनी केली.

## खा. नीलेश लंके यांची भेट आणि सोयाबीनचे पैसे वर्ग!

### सचिव निधी खरे यांची लंके यांनी घेतली होती भेट । शेतकरी वर्गात आनंद



नवी दिल्ली : प्रतिनिधी

**नॅशनल को ऑपरेटिव्ह कंज्युमर फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीनचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याच्या मागणीसाठी खा. नीलेश लंके यांनी दिल्लीत ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या सचिव निधी खरे यांनी भेट घेत हे पैसे तात्काळ वर्ग करण्याची आग्रही मागणी केल्यानंतर देशभरातील शेतकऱ्यांचे पैसे त्यांच्या खात्यावर वर्ग झाले !**

कंज्युमर फेडरेशनच्या वतीने सरकारी आधार मुल्य योजनेअंतर्गत देशभरातील शेतकऱ्यांचे सोयाबीन सध्या खरेदी करण्यात येत आहे. अनेक शेतकऱ्यांनी दोन महिन्यांपूर्वी फेडरेशनला सोयाबीनची विक्री करूनही त्यांच्या खात्यावर पैसे जमा न झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. अनेक शेतकऱ्यांनी खा. लंके यांच्याकडे त्याबाबत तक्रार करून संबंधित विभागाला पैसे वर्ग करण्यासाठी पाठपुरावा करण्याची साकडे घातले होते.

लोकसभेच्या अधिवेशनानिमित्त खा. लंके हे दिल्लीमध्ये असताना त्यांनी ग्राहक व्यवहार मंत्रालयात जात सचिव निधी खरे यांची भेट घेत शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे पैसे गेल्या दोन महिन्यांपासून मिळाले नसल्याचे खरे यांच्या निदर्शनास आणून दिले. हे पैसे तात्काळ मिळावेत यासाठी आपण ग्रामविकास, कृषि तथा किसान कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेउन शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यावर मंत्री चौहान यांची भेट घेण्याची आवश्यकता नाही, दोन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होतील अशी ग्वाही सचिव निधी खरे यांनी दिली होती.

सचिव खरे यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यावर सोयाबीनचे पैसे वर्ग झाले. ग्राहक व्यवहार मंत्रालयातून तसा संदेश खा. लंके यांना देण्यात आल्यानंतर लंके यांनी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट रद्द केली.

### राज्यात दहशतीचं वातावरण

## कृपा करा अन् त्या दहशतीतून तुम्ही बाहेर पडा

### ■ शरद पवारांकडून मस्साजोगच्या ग्रामस्थांना धीर
### ■ खा.लंके व खा.सोनवणे यांनी बीडचे प्रकरण संसदेत मांडले

बीड : प्रतिनिधी

**बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने महाराष्ट्र राज्य हादरले आहे. या घटनेचे राज्यभर तीव्र पडसाद उमटत आहेत. महाराष्ट्राचं विधीमंडळ व संसदेतही याचे पडसाद उमटले आहेत. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदारांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत तर, खासदारांनी लोकसभेत हा विषय मांडून न्यायाची मागणी केली. दरम्यान, आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे बीडचे खासदार बजरंग सोनवणे, खासदार नीलेश लंके व आमदार संदीप क्षीरसागर यांना घेऊन मस्साजोग गावात दाखल झाले. पवारांनी येथील ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांना धीर दिला.**

संतोष देशमुख यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही पवार यांनी यावेळी सांगितले. तसेच या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला शिक्षा होईपर्यंत आमचे शिलेदार स्वस्थ बसणार नाहीत असेही सांगितले.



शरद पवार म्हणाले, ''नीलेश लंके व बजरंग सोनवणे यांनी बीडचे प्रकरण संसदेत मांडले. ते पाहून या देशात, या राज्यात काय चाललंय असा प्रश्न देशभरातील प्रसारमाध्यमं विचारू लागले आहेत. तुमचं दुःख जिथे मांडायला हवं तिथे तुमच्या लोकप्रतिनिधींनी मांडलं आहे. आता सरकारने याच्या खोलात जायला हवं. याचा मुख्य सूत्रधार कोण आहे त्याच्या मुसक्या आवळायला हव्यात. हल्लेखोर व त्याचा कोणाशी संवाद चालू होता ही सगळी माहिती बाहेर काढली पाहिजे. वस्तूस्थिती समोर आणली पाहिजे. लोकसभेत खासदार बजरंग सोनवणे व खासदार नीलेश लंके यांनी जे काम केलं तेच बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी विधानसभेत केलं.

आमचे आमदारजितेंद्र उर्वरीत पान ३ वर

### मुलीचे शिक्षण शरद पवार करणार

शरद पवार यांच्याशी संवाद साधताना संतोष देशमुख यांचे कुटुंबिय म्हणाले की, आम्हाला न्याय द्या. शरद पवार हे संतोष देशमुख यांच्या मुलीशी संवाद साधताना दिसले. मुलगी कोणत्या वर्गात शिकते, कुठे शिकते हे सर्व विचारताना दिसले. यावेळी शरद पवार म्हणाले की, बारामतीला शिकायला येणार का?. तिथे मुलींचे मोठे हॉस्टेल आहे. मी पूर्ण शिक्षणाचा खर्च करतो. सगळे कॉलेज आहेत, सर्व आहे तिकडे. विशेष म्हणजे संतोष देशमुख यांच्या मुलीने देखील बारामतीला शिकण्यासाठी होकार दिला.

## बंगळुरूजवळ कंटेनर कारवर उलटला

### सांगलीतील एकाच कुटुंबातील ६ जणांचा करुण अंत । नाताळ सुट्टीसाठी येत होते गावी



कोल्हापूर : प्रतिनिधी

**बंगळुरू जवळ एक कंटेनर कारवर पलटी होऊन भीषण अपघात झाला. या दुर्घटेत कारमधील आयटी इंजिनिअरसह एकाच कुटुंबातील ६ जणांचा करुण अंत झाला. हे कुटुंब सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील मोरबगी येथील आहे. हे कुटुंब नाताळच्या सुट्टीनिमित्त गावाकडे येत होते. परंतु, वाटेतच त्यांच्यावर काळाने घाला घातला. या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे. मृतांमध्ये दोन चिमुकल्या मुली, १६ वर्षांचा मुलगा, पती-पत्नी आणि भावाच्या पत्नीचा समावेश आहे.**

बंगळुरू जिल्ह्यातील नेलमंगळा तालुक्यातील तळकेरेजवळ शनिवारी ही दुर्घटना घडली. चंद्रम इगाप्पागोळ हे मूळचे सांगलीच्या जत तालुक्यातील मोराबागी गावातील रहिवासी आहेत. ते बंगळुरू येथे एका सॉफ्टवेअर कंपनीत कार्यरत होते. नाताळनिमित्त सुट्टी असल्याने इप्पाळगोळ कुटुंब केए ०१ एनडी १५३६ व्होल्वो कारने कारने मोराबागी गावाकडे येत होते. परंतु, उर्वरीत पान ३ वर

## जगावं की मरावं,की जावं हे राज्य सोडून?

### आ.सुरेश धस विधानसभेत कडाडले



नागपूर : प्रतिनिधी

**पीक विमा योजनेवरून भाजपचे आमदार सुरेश धस यांनी सरकारला धारेवर धरले. ''२०२०, २०२३ चा पीक विमा मिळालेला नाही. आणि राज्यात काय चाललंय? मी आमदारकीबरोबर ऊसतोड मजूरांचं काम करतो. सभागृहात बंजारा समाजाचा आमदार बसलेला असेल. माझ्या माहितीप्रमाणे बंजारा समाजात चार-पाचच आडनावं आहेत. रामापूर तांड्यावरून ४००० हेक्टरचा विमा भरला गेलाय. तांड्याचा एरिया ४००० हेक्टरचा असतो का? मला कुणीतरी सांगा. कुणाच्या तरी पायातील बूट काढा आणि माझ्या तोंडात मारा'', असे म्हणत आमदार सुरेश धस विधानसभेत कडाडले.**


पीक विम्याचा परळी पॅटर्न, असा उल्लेख करत सुरेश धस यांनी महायुतीच्या मागच्या सरकारमधील कृषिमंत्र्यांवर गंभीर आरोप केले. ''रामपूर उर्वरीत पान ३ वर



निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# लसणाची पाकळी नाक चोंदणे, सर्दी लगेच बरी करते का ?



**यंदाच्या थंडीच्या महिन्यांच्या सुरुवातीला, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर, एक हेल्थ ट्रेंड तुफान व्हायरल झाला होता, ज्यानुसार तुम्ही कच्च्या लसणाची पाकळी सोलून नाकपुड्यांमध्ये ठेवल्याने होणाऱ्या चमत्कारिक फायद्यांची माहिती देण्यात आली होती. किमान २० मिनिटे अशाप्रकारे लसणाची पाकळी नाकपुडीमध्ये घालू ठेवल्यास कंजेशन म्हणजे रक्त साचणे, गुठळ्या होणे, विशेषतः नाकामध्ये सूज येणे असे त्रास कमी होण्यास मदत होऊ शकते असे या**



**व्हिडीओजमध्ये सांगण्यात येत होते. अनेकांनी असे प्रात्यक्षिक सुद्धा करून दाखवले होते. मात्र यामध्ये काही टक्के तरी तथ्य आहे का ? असे केल्यास नुकसान होऊ शकते का आणि खरोखर असे त्रास होत असल्यास त्यावर नेमके काय उपाय करणे आवश्यक आहे याविषयी आज आपण तज्ज्ञांकडून माहिती जाणून घेणार आहोत...**

डॉ. राकेश गुप्ता, वरिष्ठ सल्लागार आणि शैक्षणिक सल्लागार, इंटरनल मेडिसिन, इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल, यांनी दिलेल्या माहितीत या व्हायरल दाव्याची शहानिशा केली आहे. डॉ. गुप्ता सांगतात की चोंदलेल्या नाकात असे काहीही प्रयोग केल्याने नुकसान होऊ शकते. लसणाचा उग्र वास नाजूक नाकपुडीचे नुकसान करून श्लेष्माचे उत्पादन वाढवू शकतो. यामुळे रक्तसंचय कमी होण्याऐवजी उलटाच परिणाम होण्याची सुद्धा भीती असते. आहाराचा भाग म्हणून शरीरात प्रवेश करणारा लसूण अँटी बॅक्टेरियल असला तरी त्याचा थेट उतींशी येणारा संपर्क नाकातील जिवाणूंची संख्या वाढवू शकतो. यामुळे काही चिंताजनक लक्षणांसह संसर्ग होऊ शकतो. नाकात लसणाची पाकळी घातल्याने अनेक धोके निर्माण होतात, सर्वात मोठी जोखीम म्हणजे नाकामध्ये लसणाची पाकळी नाकात अडकून बसू शकते. ज्यामुळे श्वसनाला अडथळा निर्माण होतो. लसणाचे तुकडे झाल्यास ते श्वसन नलिकेतून फुफ्फुसात जाऊ शकतात, ज्यामुळे वातनलिकेत जखमा होतात किंवा गुदमरल्यासारखे होऊ शकते. अशा स्थिती हाताळण्यासाठी वेगळ्या प्रतिजैविकांची देखील गरज भासू शकते. समजा आपण लसूण घातलेले तेल नाकात सोडण्याचा विचार करत असाल तरी काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, अशा तेलामुळे त्वचेची जळजळ, पुरळ आणि गंभीर ॲलर्जीक प्रतिक्रिया होण्याची शक्यता असते.

## अन्य पर्याय कोणते ?

नाक चोंदलेले असल्यास त्यावर उपचारांसाठी अन्य अनेक पर्याय आहेत. अनेक स्प्रे, इन्हेलर्स नाकपुड्यांमधील संसर्ग कमी करण्यास मदत करू शकतात. शिवाय ज्यांना नेती पॉट वापरण्याची सवय असेल त्यांनी किंचित क्षार युक्त खारट पाणी वापरून पाहायला हवे यामुळे अगदी रक्तसंचय पूर्णपणे बरा होत नसला तरी सुजलेल्या सायनसचा त्रास कमी होऊ शकतो. त्याशिवाय डॉक्टर असे सुचवतात की, शरीर सर्दी किंवा व्हायरलपासून ठराविक कालावधीपर्यंत स्वतःला बरे करू शकते व एकदा सर्दी बरी झाली की नाक चोंदले जाण्याचा त्रास कमी होऊ शकतो. डॉ. गुप्ता सांगतात की, यातून आणखी एक बाब लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे सोशल मीडियावर फिरणाऱ्या ट्रेंडवर अवलंबून न राहता आरोग्यविषयक समस्यांसाठी पुराव्यावर आधारित आणि वैद्यकीयदृष्ट्या मान्यताप्राप्त उपायांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. यासाठी निदान तुमच्या डॉक्टरांशी बोला.

# हिवाळ्यात कफ, सर्दी, तापामागची कारणे काय ?



**हिवाळ्यात हवेमधील आर्द्रतेचे प्रमाण घटल्यामुळे (३० टक्क्यांहून कमी झाल्यामुळे) ती हवा सुखावह वाटते. मात्र ती हवा कोरडी असते. थंडीतली ती कोरडी हवासुद्धा आरोग्याला बाधक होऊ शकते. जेव्हा कमी आर्द्रता (ओलावा) असलेली अशी थंड-कोरडी हवा नाकामधून आत शिरून उर्ध्व श्वसनमार्गामध्ये जाऊन पोहोचते, तेव्हा त्या थंड हवेमुळे नाकामधील श्लेष्मल आवरण (आतील बुळबुळीत आवरण) थंड पडून त्याखालील शीरांचे आकुंचन होते, जे विविध समस्यांना कारणीभूत ठरते...**

गार हवेमुळे नाकाचे आतील आवरण, किंबहुना संपूर्ण श्वसनमार्ग थंड पडू नये म्हणून त्या हवेला गरम करण्याचा प्रयत्न शरीर करत असते. ज्यामुळे घशामधील हवेचे तापमान ३० अंश फॅरेन्हाईटपर्यंत पोहोचते. अशा गरम हवेची आर्द्रतेला धरून ठेवण्याची क्षमता अधिक असल्याने ती हवा बाहेर पडताना आपल्यासोबत शरीरातील आर्द्रतासुद्धा बाहेर फेकते. दुर्दैवाने त्या आर्द्रतेबरोबर श्वसनमार्गाला अत्यावश्यक स्त्रावामधील ओलावासुद्धा बाहेर फेकला जातो, ज्यामुळे श्वसनमार्ग हळूहळू कोरडा पडत जातो.(त्या व्यक्तीने त्याच दरम्यान कमी प्रमाणात द्रवपदार्थांचे प्राशन, कमी प्रमाणात तेलतूपाचे सेवन, थंड-कोरड्या गुणांचा आहार अधिक खाणे, रात्री जागरण अशा चुका केल्यास) श्वसनमार्गाचा कोरडेपणा अधिकच वाढून घशाची खवखव, घसादुखी, कोरडा खोकला अशा लक्षणांना हे सारे कारणीभूत ठरते.

## नाकावाटे जंतूसंसर्ग

हिवाळ्यात शरीरातून श्वसनावाटे ओलावा अधिक प्रमाणात फेकला जात असल्याने (आणि त्यात अधिक त्या व्यक्तीचे जलप्राशन किंवा ओलावा पुरवणाऱ्या पदार्थांचे सेवन कमी असल्यास आणि त्याला थंड, गोड, बुळबुळीत पदार्थांच्या सेवनाची जोड दिल्यास) शरीरात पाण्याची कमतरता झाल्याने, ओलाव्या अभावी नाकातून वाहणारा स्त्राव पातळ न होता थोडा चिकट, बुळबुळीत व घट्ट असा तयार होतो आणि आपण म्हणतो नाकातून शेंबूड येत आहे. चिकटपणामुळे नाकातला स्त्राव सहजगत्या बाहेर फेकला जात नसेल तर नाक चोंदते व नाकातून हवा नीट शिरू न शकल्याने श्वास घेण्यास त्रास होतो. त्यात अधिक हवा खूप थंड व कोरडी असेल (आणि त्यात त्या व्यक्तीने अल्प द्रवसेवनाची व कोरड्या गुणांच्या आहाराची जोड दिल्यास, श्वसनमार्गावर, त्यातही नाकावर कोरड्या हवेचा सतत मारा होत असल्यास श्वसनमार्गात कोरडेपणा अधिकच वाढून) नाकामधील स्त्राव पूर्णपणे सुकून नाकाच्या आत स्त्रावाच्या खपल्या चिकटतात व तेव्हा नाक चोंदते व दुखू लागते. याउलट स्त्राव अधिक प्रमाणात बाहेर पडत असेल व तिथे जंतुसंसर्ग झाल्याने नाकावाटे घट्ट व हिरवट-पिवळा स्त्राव येत असेल तर त्याला आपण 'पिकलेली सर्दी' म्हणतो.



## खोकला का होतो ?

चेहऱ्याच्या पोकळ्यांवर (सायनसेसवर) थंड व कोरड्या हवेचा सतत दीर्घकाळ मारा होत असल्यास (आणि त्यात अधिक ती व्यक्ती दूधदुभते, गोड, बुळबुळीत पदार्थ वगैरे कफवर्धक पदार्थांचे सेवन जास्त प्रमाणात करत असल्यास) सायनसेसमध्ये व नाकामध्ये अधिक कफ जमतो, जो स्त्राव घशाच्या मागून श्वासनलिकेत उतरू लागतो, तेव्हा त्या चिकट स्त्रावाला बाहेर काढण्यासाठी शरीराला उर्ध्वदिशेने वेगाने जोर लावावा लागतो, ज्याला आपण 'खोकला' म्हणतो. या स्थितीमध्ये थंड हवेचा संपर्क तसाच पुढे सुरू राहिल्यास (त्यात अधिक त्याला कफवर्धक आहाराची, दिवसा झोपण्याची, व्यायाम न करण्याची जोड मिळाल्यास) कफाच्या या स्त्रावामध्ये जंतुसंसर्ग होतो आणि कफाचा स्त्राव हिरवट-पिवळ्या रंगाचा होतो. कफस्त्रावामधील जंतूंचे प्रमाण वाढत गेल्यास त्या जंतूंचा नाश करण्यासाठी त्यांच्याबरोबर पांढऱ्या पेशींची जी लढाई होते, त्या लढाईचा प्रयत्न म्हणून शरीराचे तापमान वाढवले जाते त्याला आपण 'ताप' म्हणतो.

## सर्दी हा होते ?

श्वसनमार्ग, विशेषतः उर्ध्व श्वसनमार्ग थंड व कोरडा पडतो, तेव्हा त्या स्थितीमध्ये श्वसनमार्ग आपला श्लेष्मल स्त्राव वाढवण्याचा प्रयत्न करतो, ज्यामुळे नाक वाहू लागते, त्याला आपण 'सर्दी' म्हणतो. सर्दी ही वास्तवात शरीराची संरक्षणात्मक प्रतिक्रिया आहे, जी एकीकडे उर्ध्व श्वसनमार्गाचा कोरडेपणा कमी करण्यास तर दुसरीकडे शरीराचे तापमान संतुलित करण्यास सहाय्यक होते. हिवाळ्यात शरीरामध्ये वाढलेला थंडावा अधिकच्या स्त्रावावाटे बाहेर फेकण्याचा प्रयत्न शरीर करत असते.

## उपाय काय ?

हे झाले थंडीमध्ये, त्यातही कडक थंडीमध्ये होणाऱ्या सर्दी, कफ, खोकला, तापामध्ये प्रत्यक्षात काय होते हे दर्शविणारे संक्षिप्त चित्र. या सर्व स्थितीचा सामना करण्याचा सोपा प्रयत्न आयुर्वेदाने सांगून ठेवला, तो म्हणजे थंड, गोड, बुळबुळीत अशा गुणांचा कफवर्धक आहार टाळणे. याउलट आहार उष्ण घेणे, उष्ण गुणांचे द्रवपदार्थ पित राहणे, दिवसभरातून गरम पाणी पिणे आणि गरम पाण्याची वाफ घेणे. जे घशाला कोरडा पडू देत नाही, तिथले तापमान थंड होऊ देत नाही, श्लेष्मल स्त्रावाला बुळबुळीत होऊ देत नाही, स्त्राव पातळ करून त्याला बाहेर फेकण्यास साहाय्य करते, रोगजंतुंची वाढ व प्रसार रोखते आणि कफाचा त्रास कमी होतो.

# रक्तातील खराब युरिक ॲसिड झपाट्याने काढणारे पाच पदार्थ

**कोलेस्ट्रॉल आणि रक्तातील साखरेप्रमाणेच शरीरात युरिक ॲसिडची पातळी वाढणे हेही आरोग्यासाठी धोकादायक आहे. युरिक ॲसिड हे रक्तात आढळणारे एक टाकाऊ पदार्थ आहे. प्युरीन असलेल्या पदार्थांपासून आपल्या शरीरात युरिक ॲसिड वाढतो. अतिरिक्त प्युरीनयुक्त पदार्थ खाण्यामुळे शरीराला युरिक ॲसिड नष्ट करणे कठीण होते आणि आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात**

## युरिक ॲसिड म्हणजे काय ?

युरिक ॲसिड हे रक्तात आढळणारे रसायन आहे. हे प्युरीनयुक्त पदार्थांच्या पचन प्रक्रियेदरम्यान तयार होते. जेव्हा शरीरातील प्युरीनचे प्रमाण एका ठराविक प्रमाणापेक्षा जास्त वाढते आणि मूत्रपिंड ते योग्य प्रकारे फिल्टर करू शकत नाही, अशा स्थितीत शरीरात युरिक ॲसिड वाढू लागते आणि त्यामुळे शरीरात अनेक समस्या निर्माण होतात. शरीरात युरिक ॲसिड जमा होणे अत्यंत धोकादायक मानले जाते. शरीरातील रक्तातील युरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्यास सांधेदुखी, किडनीचे आजार, हृदयविकाराचा झटका हे धोकादायक आजार होण्याचा धोका वाढतो. जेव्हा आपण प्युरीन असलेले काही पदार्थ खातो तेव्हा शरीरात युरिक ॲसिडची पातळी सामान्यपेक्षा जास्त असते. रक्तातील खराब युरिक ॲसिड वाढल्याने किडनी निकामी होण्याचा धोका वाढू शकतो. वाढलेलं युरिक ॲसिड कमी करण्यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश करावा, याविषयी हैदराबाद येथील केअर हॉस्पिटल्सच्या डॉ. जी. सुषमा यांनी माहिती दिली. डॉक्टरांच्या मते, युरिक ॲसिड वाढणे याला वैद्यकीय भाषेत हायपरयुरिसेमिया म्हणतात. औषधामध्ये युरिक ॲसिडसाठी अनेक औषधे आणि उपचार उपलब्ध आहेत, परंतु आपण काही आयुर्वेदिक उपायांनीदेखील आराम मिळवू शकतो. ज्यांना युरिक ॲसिडचे प्रमाण जास्त असल्याने उद्भवणारे त्रास असतात, अशा लोकांनी सिट्रसयुक्त फळांचे सेवन करणे फायद्याचे ठरू शकते. यात विशेषतः संत्रे, आवळा, लिंबू अशी फळं समाविष्ट असतात. या आम्लयुक्त फळांमध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण मुबलक असते. ही फळे शरीरातील टॉक्सिन्ससारखे पदार्थ बाहेर काढून टाकण्यात मदत करतात.

- केळी : युरिक ॲसिड नियंत्रित करण्यासाठी दररोज सकाळी आणि संध्याकाळी एक केळं खाल्ल्याने तुमच्या शरीरातील युरिक ॲसिडची पातळी कमी होऊ शकते. केळ्यामध्ये प्युरीनचे प्रमाण फारच कमी असते. याशिवाय केळ्यामध्ये जीवनसत्त्वे पुरेशा प्रमाणात आढळतात. सांधेदुखीसारख्या गंभीर समस्यांपासून बचाव करण्यासाठी व्हिटॅमिन सी खूप फायदेशीर आहे.
- कमी चरबीयुक्त दूध आणि दही : कमी चरबीयुक्त दूध आणि कमी चरबीयुक्त दही तुमच्या युरिक ॲसिडवरची पातळी कमी करण्यास मदत करते. एवढेच नाही तर ते तुमच्या शरीरातून युरिक ॲसिडला बाहेर काढण्यास मदत करते.
- कॉफी : कॉफीमध्ये काही असे एन्झाइम आढळतात, जे शरीरातील प्युरीन तोडण्याचे काम करते. यामुळे युरिक ॲसिडचा वेग कमी होतो आणि लोकांना युरिक ॲसिडच्या त्रासापासून सुटका होण्यास मदत मिळते. तसंच कॉफीमध्ये शरीरात युरिक ॲसिड व्यवस्थित गाळून घेण्याची क्षमताही असते. यामुळे कॉफीच्या मदतीने युरिक ॲसिड स्तर नियंत्रणात राहतो.
- लिंबूवर्गीय फळे : आवळा, लिंबू, संत्री, पपई आणि अननस यांसारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, म्हणून ते नैसर्गिकरित्या युरिक ॲसिडची उच्च पातळी कमी करण्यास मदत करतात.
- चेरी : चेरीचे सेवन युरिक ॲसिड नियंत्रित करण्यासाठी खूप प्रभावी आहे. चेरी युरिक ॲसिड कमी करते, कारण त्यात अँथोसायनिन्स असतात, जे चेरींना त्यांचा रंग देतात. ज्या लोकांना युरिक ॲसिड जास्त आहे, त्यांनी चेरीचे सेवन करावे.

# स्तनाच्या कर्करोगाविषयी आठ गैरसमज



**सध्या कर्करोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. कर्करोगाविषयी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी सर्व स्तरावर विविध उपक्रम राबविले जातात. कर्करोगामध्ये हल्ली स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाणसुद्धा वाढले आहे. मागील काही अभ्यासांमधून असे समोर आले आहे की, भारतात स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण महिलांमध्ये वाढत आहे आणि तेही शहरी भागातील महिलांमध्ये याचे प्रमाण अधिक दिसून येत आहे.**

- फक्त महिलांना स्तनाचा कर्करोग होतो : महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण अधिक आढळते. अशावेळी हे समजून घेणे गरजेचे आहे की, पुरुषांनासुद्धा स्तनाचा कर्करोग होऊ शकतो. या कर्करोगाविषयी कमी जागरुकता आणि याकडे दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीमुळे पुरुषांना स्त्रियांच्या तुलनेत २५ टक्के जास्त मृत्यूदराचा सामना करावा लागतो.
- ज्या महिलांच्या स्तनाचा आकार मोठा असतो. त्यांना स्तनाचा कर्करोग होण्याची जास्त : स्तनाचा आकार आणि कर्करोगाचा धोका याचा काहीही संबंध नाही. जरी लठ्ठपणा आणि स्तनाची घनता कर्करोगाचा धोका वाढवते, तरी कुटुंबात यापूर्वी जर कुणाला स्तनाचा कर्करोग असेल किंवा चुकीच्या जीवनशैलीमुळे, याचा परिणाम सर्वात आधी स्तनाच्या कर्करोगावर दिसून येतो.
- वयोवृद्ध महिलांनाच स्तनाचा कर्करोग होतो : वयानुसार स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढतो, पण हा कर्करोग तरुण वयोगटातील महिलांसह सर्वच वयाच्या महिलांमध्ये आढळून येतो. तरुण वयातील महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग अधिक आक्रमकरित्या दिसून येतो. लक्षणे आढळल्यानंतर लवकरात लवकर उपचार केल्यामुळे हा कर्करोग ओळखणे सोपा जातो.
- स्तनाचा कर्करोग त्याच लोकांना होतो, ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांमध्ये यापूर्वी हा कर्करोग आढळलेला असतो : जर तुमच्या कुटुंबातील सदस्यांना स्तनाचा कर्करोग यापूर्वी आढळून आला असेल, तर तुम्हालाही कर्करोग होण्याची शक्यता असते. पण, आतापर्यंत अशा अनेक लोकांना स्तनाचा कर्करोग आढळला आहे, ज्यांच्या कुटुंबात कोणालाही यापूर्वी हा कर्करोग नव्हता. फक्त दहा टक्के त्या लोकांना स्तनाचा कर्करोग होतो, ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांमध्ये यापूर्वी हा कर्करोग आढळलेला असतो.



**भारतात दरवर्षी स्तनाच्या कर्करोगाची सुमारे एक लाख प्रकरणे समोर येतात. देशातील एकूण लोकसंख्येपैकी १३.५ टक्के लोकांना स्तनाचा कर्करोग आढळतो आणि त्यामुळे होणारा मृत्यूदर १०.६ टक्के आहे. आता सोशल मीडियाच्या जगात स्तनाच्या कर्करोगाविषयी अनेक गैरसमज पसरवले जातात. या गोष्टीचा विचार करून राम मनोहर लोहिया हॉस्पिटलच्या वरिष्ठ सर्जन डॉ. दिव्या सिंह यांनी स्तनाच्या कर्करोगाविषयी असलेले आठ गैरसमज सांगितले आहेत आणि त्याविषयी सविस्तर माहिती सांगितली आहे.**

- स्तनाच्या कर्करोगाच्या गाठी खूप वेदनादायी असतात : सर्वच प्रकारचे स्तनाचे कर्करोग वेदनादायी नसतात. अनेक प्रकरणांमध्ये वेदना होत नाहीत. विशेषतः कर्करोगाच्या सुरुवातीच्या काळात फार वेदना होत नाहीत. स्तनाच्या जागी होणारी वेदना किंवा अस्वस्थता हे एक लक्षण असू शकते, पण वेदना होत नाही म्हणून स्तनाचा कर्करोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
- ब्रा घातल्यामुळे स्तनाचा कर्करोग होऊ शकतो : ब्रा किंवा इतर कोणतेही कपडे घातल्यामुळे स्तनाचा कर्करोग होत नाही. असं म्हणतात, ब्रा आणि विशेषतः वायर ब्रामुळे स्तनामधून लिम्फ फ्लूडच्या प्रवाहामध्ये अडथळा निर्माण होतो आणि त्यामुळे टिश्यूमध्ये विषारी पदार्थ तयार होतात; पण याबाबत कोणताही पुरावा समोर आलेला नाही.
- मॅमोग्रामुळे स्तनाचा कर्करोग होतो आणि सगळीकडे पसरतो : लवकरात लवकर स्तनाचा कर्करोग ओळखण्याचा मॅमोग्राम प्रभावी मार्ग आहे. मॅमोग्रामध्ये खूप कमी रेडिएशन एक्सपोजरचा वापर केला जातो. या रेडिएशन एक्सपोजरचा धोका खूप कमी असतो.
- स्तनामध्ये जर गाठ आढळली तर कर्करोग होऊ शकतो : जर तुमच्या स्तनामध्ये गाठ आढळली तर घाबरू नका. तज्ज्ञांकडे किंवा डॉक्टरांकडे तपासणी करा आणि त्यांचा सल्ला घ्या. स्तनामध्ये आढळलेल्या प्रत्येक गाठीचा कर्करोगाशी संबंध नसतो. जर अशी गाठ आढळल्यास लगेच तज्ज्ञांकडून तपासणी करून घ्या.

## शॉर्ट न्यूज

### ...अन्यथा तहसीलदारांकडे परवाने सोपवणार

**नेवासा :** रासायनिक खत कंपनीकडून प्रत्येक खतासोबत काही ना काही लिंकिंग दिले जात आहे. मात्र शेतकऱ्यांना खते वाटप करताना प्रचंड अडचणी येत असून प्रत्येक कंपनीसोबत दिले जाणारे लिंकिंग तातडीने बंद करावे, अन्यथा नेवासा तालुक्यातील खत पुरवठादार असोसिएशन आपले खत परवाने तहसीदार यांचेकडे जमा करतील, असा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे. सध्या रब्बी हंगाम चालू असल्यामुळे खताची मागणी प्रचंड वाढली आहे. मात्र खत कंपन्या खतासोबत लिंकिंगची सक्ती करत आहेत. संबंधित दुकानदारास आवश्यक तो खतपुरवठा केला जात नाही.

### ससाणे खूनप्रकरण आरोपींना मोक्का

**पाथर्डी :** तिसगाव (ता. पाथर्डी) येथील मच्छिंद्र ससाणे खून प्रकरणातील दहा आरोपींना मोक्का लावण्यात आला आहे. यातील पाच आरोपींना अटक करून अहिल्यानगर येथील विशेष मोक्का न्यायाधीश बागल यांच्यासमोर हजर केले असता त्यांना १० दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. कोठेवाडीनंतर पाथर्डी तालुक्यात मोक्का लावण्याची ही दूसरी घटना आहे. पोलिस उपअधीक्षक सुनील पाटील या प्रकरणाचा तपास करीत आहेत. मोक्का लावण्याची तालुक्यातील ही दुसरी घटना आहे.

### काळे कारखान्याची पहिली उचल २ हजार ८०० रुपये

**कोपरगाव :** राज्यातील २०२४-२५ चा गळीत हंगाम सुरु होऊन जवळपास एक महिन्याचा कालावधी पूर्ण होत आहे. कर्मवीर शंकरराव काळे साखर कारखान्याने पहिली उचल प्रति मे. टन २ हजार ८०० रुपये देण्याचे जाहीर करून गाळप झालेल्या उसाचे पंधरवडानिहाय पेमेंट ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे यांनी दिली.आ.काळे यांनी सांगीतले की साखरेचा किमान विक्री दर ३ हजार ६०० प्रति क्विंटल करावा, अशी मागणी केंद्र सरकारकडे केलेली आहे.

### दुभत्या जनावरांचे रोग-चारा व्यवस्थापन

**राहुरी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्था व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित, कृषी महाविद्यालय लोणी येथील अंतिम वर्षात शिकत असलेल्या कृषिदुताकडून जनावरांचे रोग व चारा व्यवस्थापन याविषयी (रामपूर ता. राहुरी) येथे कृषी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कृषिदुत सागर नरवडे, ओमकार पाटील, रितेश लोंढे, संकेत कर्डिले, नितीन धारकर, विनायक जगदाळे, गोवर्धन मते यांनी सदर चर्चासत्राचे आयोजन केले होते.

### २३ डिसेंबरला रिपाईचा आत्मदहनाचा इशारा

**नगर :** परभणी मध्ये झालेल्या संविधानाच्या विटंबनेचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (गवई) वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निषेध नोंदवून भीम सैनिकांवरील गुन्हे त्वरित मागे घ्यावे, कोंबिंग ऑपरेशन थांबवावे व सोमनाथ सूर्यवंशी मारहाणीत मयत झालेले असताना त्या पोलीसावर खूनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी रिपाईच्या वतीने करण्यात आली. सदर प्रकरणी कारवाई न झाल्यास रिपाईच्या सर्व आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी २३ डिसेंबर रोजी सामुदायिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

# मधुमक्षिका पालकांनी मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी करावी

## संचालक किसन मुळे यांचे आवाहन

नगर : प्रतिनिधी

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाद्वारे राष्ट्रीय मधुमक्षिका मंडळ, नवी दिल्ली अंतर्गत विकसित केलेल्या ./ या मधुक्रांती पोर्टलवर मधुमक्षिका पालकांनी नोंदणी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाचे संचालक किसन मुळे यांनी केले आहे.

मध आणि मधमाशी संबंधित अन्य उत्पादनांच्या योग्य स्त्रोताचा शोध घेण्याच्यादृष्टीने व अद्यायावत नोंदी ठेवण्यासाठी मधुक्रांती पोर्टल विकसित करण्यात आले आहे. राज्यात राष्ट्रीय मधुमक्षिकापालन व मध अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने पुणे येथील महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळास यांना राष्ट्रीय मधुमक्षिका पालन व मध अभियान राबविणारी राज्यस्तरीय अंमलबजावणी यंत्रणा म्हणून केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. हे अभियानांतर्गत लघु अभियान १, २ आणि ३ समाविष्ट असून यामध्ये विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.



मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी केल्यास विविध लाभ मिळणार आहेत. यात मधुमक्षिकापालकाला नोंदणीकृत किंवा मान्यताप्राप्त मधुमक्षिकापालक म्हणून ओळख मिळणार आहे. नोंदणी धारकांना १ लाखापर्यंत मोफत विमा उपलब्ध होणार आहे. तसेच विना अडथळा मधुमक्षिका पेट्यांचे स्थलांतर करता येणार आहे.

मधुक्रांती पोर्टलवर नोंदणीसाठी आधार कार्ड, अद्ययावत भ्रमणध्वनी क्रमांक (आधार क्रमांकाशी जोडलेला), मधुमक्षिका पालनासंबंधित तपशील, मधुमक्षिकापालन प्रशिक्षण प्रमाणपत्राची सॉफ्ट प्रत (आकार-२०० केबीपर्यंत), मधुमक्षिकापालकाचा मधुमक्षिका पेट्यांसमवेत फोटो (आकार-१०० केबीपर्यंत) ही कागदपत्रे आवश्यक असणार आहेत.

या नोंदणीसाठी फक्त ऑनलाईन पद्धतीने भरता येणार आहे. स्वमालकीच्या मधुमक्षिका पेट्यांमधील मधुमक्षिका वसाहतींची संख्या १० ते १०० फ्रेमसाठी २५० नोंदणी शुल्क, १०१ ते २५० फ्रेमसाठी ५०० रुपये, २५१ ते ५०० फ्रेमसाठी एक हजार, ५०१ ते १ हजार फ्रेमसाठी दोन हजार, १००१ ते दोन हजार फ्रेमसाठी दहा हजार, २००१ ते ५ हजार फ्रेम साठी २५ हजार, ५००१ ते दहा हजार फ्रेमसाठी एक लाख तर दहा हजारापेक्षा अधिक फ्रेमसाठी दोन लाख नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे.


नोंदणीबाबत अधिक माहितीसाठी राष्ट्रीय मधमाशी मंडळ, नवी दिल्ली ०११-२३३२५२६५, २३७१९०२५ किंवा मधुक्रांती पोर्टल टेक्निकल सपोर्ट- १८००१०२५०२६, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे- ०२०-२९७०३२२८ या क्रमांकावर संपर्क करावा. जास्तीत जास्त मधुमक्षिका पालकांनी मधुक्रांती पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन या पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर बॅरिकेट बसवा

## रिपाईची आयुक्तांकडे मागणी

नगर : प्रतिनिधी

**शहरातील मार्केटयार्ड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारी बॅरिकेट बसवावे, अशी मागणी रिपाई आंबेडकर पक्षाचे रोहित आव्हाड यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केली आहे. यावेळी बौद्धचार्य संजय कांबळे, भीमसैनिक जिवा कांबळे, आरपीआय आठवले गटाचे अविनाश भोसले आदीसह अन्यथा समस्त आंबेडकर समाज बांधव उपस्थित होते. बॅरेकेट न बसविल्यास आंदोलन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.**



अनेक वर्षापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याची मागणी करण्यात आली होती. त्यासाठी नवीन पुतळा उभारण्यासाठी सुशोभीकरण करण्यात आले. मात्र त्याला संरक्षण भिंत नसल्याने अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला बॅरीकेट बसविण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

# मनपाचे क्रीडा संकुल मार्च महिन्यात खुले होणार

## आयुक्त यशवंत डांगे यांची माहिती

नगर : प्रतिनिधी

**शहरातील रस्ते, पाणी व वीज या पायाभूत सुविधांचा प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्याचे नियोजन महापालिका करत आहे. त्यासह नागरिकांना मनोरंजन, विरंगुळा, आरोग्य सेवांसह खेळाडूंना चांगल्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा संकुलाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सारसनगर परिसरात सुमारे दोन एकर जागेत सर्व अत्याधुनिक सुविधांचा समावेश असलेल्या या क्रीडा संकुलाच्या उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या मार्च महिन्यात हे क्रीडा संकुल नागरिकांसाठी खुले होईल, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.**

आयुक्त यशवंत डांगे यांनी कामाची पाहणी करून आढावा घेतला. महापालिकेच्या माध्यमातून साकारल्या जात असलेल्या या प्रकल्पासाठी आमदार संग्राम जगताप यांनी ३ कोटी ४३ लाख रुपयांचा निधी जिल्हास्तर सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानातून उपलब्ध करून दिला आहे. या क्रीडा संकुलात विविध प्रकारच्या इनडोअर व आऊटडोअर क्रीडा प्रकारांसाठी मैदाने व सुविधा देण्यात येणार आहेत. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील व्यक्तींना या सुविधांचा लाभ



घेता येणार आहे.

क्रीडा संकुलात टेनिस कोर्ट, व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, बॉक्स क्रिकेट, कबड्डी आदी विविध खेळांसाठी मैदाने असणार आहेत. तसेच बॅडमिंटन हॉल, टेबल टेनिस, रायफल शूटिंग, बॉक्सिंग रिंग, मल्टिपर्पज हॉलमध्ये कॅरम, बुद्धीबळ अशा व इतर इनडोअर खेळांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या खेळांच्या स्पर्धा भरविता येतील, अशा पद्धतीने सर्व प्रकारच्या सुविधा खेळाडूंना उपलब्ध होणार आहेत. तसेच, या भव्य क्रीडा संकुला भोवती मोठी संरक्षक भिंत व नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक उभारण्यात येणार आहे. सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी अत्याधुनिक यंत्र व साधने असणारी जिम, योगासाठी हॉल व झुंबासाठीही स्वतंत्र हॉल उभारण्यात येणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

## वाचकांच्या लेखणीतून

# फेफड़े आणि फुफ्फुस



अमिताभ बच्चन. हिंदी चित्रपटसृष्टीतील एक काळचा आघाडीचा नेता. तो हिंदी चित्रपटांत नायक आणि चरित्रनायक म्हणूनही झळकलेल्या आहे. शोले, सौदागर....किती म्हणून त्याच्या हिंदी चित्रपटांची नावे घ्यावीत? त्याला दैवी आवाजाने आमची देणगी आहे. तो आता वयोमानानुसार थकलेला दिसला तरी त्याच्यात अजूनही अभिनयाची धमक आहे ते लपून राहत नाही. शिवाय तो पडला एका साहित्यिक पित्याचा, हरिवंशराय बच्चन यांचा पुत्र. त्यामुळे समाजमाध्यमांवरील त्याच्या बोलण्यातून साहित्यिक गोष्टींची झलक पहायला मिळाली नाही तर नवलच!

दूरदर्शनच्या कौन बनेगा करोड़पति (केबीसी) या कार्यक्रमात एक मराठी स्पर्धक समोर होते. त्याच्या बोलण्यातून फेफड़े या हिंदी शब्दाला मराठीत फुफ्फुस म्हणतात असे कळले. यावर अमिताभ हजरजबाबीपणाने म्हणाला, यार फुफ्फुस ये तो अजीब-सा शब्द है मराठी में! लगता है हमेशा फुसफुस करता है इसलिए फेफड़े को शायद मराठी में फुफ्फुस कहते हैं? अमिताभच्या या हजरजबाबीपणावर आणि फुफ्फुस शब्दाची त्याने लावलेली व्युत्पत्ती ऐकून प्रेक्षक श्रोते खळखळून हसले! मीही त्या हसणारांपैकीच एक होतो.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# साई मूर्तीची झीज रोखण्यासाठी दूग्धाभिषेक टाळा

## पाहणीनंतर तज्ज्ञांकडून सल्ला । दीड महिन्यात सविस्तर अहवाल देणार

शिर्डी : प्रतिनिधी

**शिर्डीच्या साईबाबा समाधी मंदिरातील मूर्तीचे संवर्धन करण्यासाठी तसेच मूर्तीची झीज रोखण्यासाठी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाच्या तज्ज्ञांमार्फत शुक्रवारी मूर्तीची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान भाविकांसाठी ३ तास दर्शन व्यवस्था बंद ठेवण्यात आली होती.**

साईबाबांच्या मूर्तीची झीज टाळण्यासाठी तज्ज्ञांनी मूर्तीच्या स्नानासाठी कमी पाण्याचा वापर करणे, मूर्तीला आंघोळ घातल्यानंतर टॉवेलने घासणे, दही-दुधाचा, गंधाचा वापर टाळणे, गंधासाठी चंदनाचाच वापर करणे आदी तोंडी सूचना केल्या. काही अंशी मूर्तीची झीज झाल्याचेही तज्ज्ञांनी मान्य केले. याबाबतचा लेखी



अहवाल संस्थानला प्राप्त झाल्यानंतर साई संस्थानची समिती निर्णय घेईल, असे साई संस्थानचे प्रभारी सीईओ बाळासाहेब कोळेकर यांनी सांगितले.

वस्तुसंग्रहालयाचे एस. मुखर्जी यांच्या नेतृत्वाखालील पाच तज्ज्ञांचे पथक शुक्रवारी सकाळी शिर्डीत दाखल झाले. या पथकाने द्वारकामाई मंदिराची पाहणी केली. त्यानंतर दुपारी पावणेदोननंतर साई मंदिर पूर्णपणे बंद केले. मंदिरातील सीसीटीव्ही बंद केले. याशिवाय मूर्तीच्या बाजूने पडदे लावून मूर्तीचे मायक्रो इन्स्पेक्शन करण्यात आले. मूर्तीला जेथे काळे ठिपके पडले आहेत किंवा जेथे झीज झालेल्या ठिकाणची अद्ययावत कॅमेऱ्याने फोटोग्राफी करून ते अभ्यासासाठी संगणकात संरक्षित करण्यात आले.

**थ्रीडी स्कॅनिंग म्हणजे काय?**

मूर्तीचे थ्रीडी स्कॅनिग म्हणजे मूर्तीची अचूकता टिपणे आहे. ३६०अंशांतून मूर्तीच्या चारही बाजूंनी विशिष्ट अद्ययावत फोटोग्राफी मूर्तीची अचूक भौमितिक माहिती मिळवता येते. तज्ज्ञांच्या अहवालानंतर साई मूर्तीच्या थ्रीडी स्कॅनिंगबाबत निर्णय होईल.

# काही खात्यांवरून तिन्ही पक्षात वाद

## मंत्री गुलाबराव पाटलांनी केले स्पष्ट

नागपूर : प्रतिनिधी

**राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले त्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार देखील झाला. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री बनले तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री तसेच अनेक आमदारांना मंत्रिपद देखील मिळाले. मात्र, सध्या खातेवाटप कधी होणार हा प्रश्न अनेकांना पडला आहे. खातेवाटप रखडल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असून विरोधक देखील यावरून टीका करत आहेत. यावर आता शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**



गुलाबराव पाटील म्हणाले, खाते मिळणार आहेत, मात्र शपथ घेतल्यानंतर आता आपले मंत्रिपदाचे काम सुरू झाले आहे. पुढील एक ते दोन दिवसांत खाते वाटप जाहीर होईल. खाते वाटपला विलंब झालेला नाही. पण एक दोन खात्यांबद्दल तिघांमध्ये वाद आहे. तिघे एकत्र बसतील आणि चर्चा करतील. त्यानंतर एक दोन दिवसांत खात्यांचे वाटप होईल, असे गुलाबराव पाटील यांनी सांगितले आहे.

पुढे बोलताना गुलाबराव पाटील म्हणाले, कुठलेही खाते मिळाले तरी शेवटी खाते हे खाते असते. कॅबिनेट मंत्री होणे एवढे सोपे नाही. पाच वर्षांचा काळ काढल्यानंतर पुन्हा कॅबिनेट मंत्रिपद भेटले आहे. मला वाटते दुसऱ्यांदा कॅबिनेट मंत्रिपद भेटणे ही जळगाव जिल्ह्यातील पहिलीच घटना आहे.

पालकमंत्री असो किंवा कोणते खाते मी कुठल्याही गोष्टीसाठी डिमांड केलेली नाही. नेत्यांनी माझ्यावर विश्वास टाकला आहे. त्या विश्वासाला खरा उतरण्याचा मी प्रयत्न करेल, असे गुलाबराव पाटील म्हणाले आहेत. यावेळी बोलताना गुलाबराव पाटील यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, जि घटना घडली ती निश्चितपणे निषेधार्ह आहे.

(पान १ वरून)

### कृपा करा अन् त्या दहशतीतून तुम्ही बाहेर पडा

आव्हाड यांनी देखील संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरण विधानसभेत मांडलं. ते कोणत्या जातीचे आहेत, कोणत्या समाजाचे आहेत, कोणत्या मतदारसंघातील आहेत, याचा विचार न करता क्षीरसागर व आव्हाड यांनी विधानसभेत हा विषय मांडला. त्यांनी एक गोष्ट प्रामुख्याने मांडली ती म्हणजे या मागचा सूत्रधार कोण आहे ते सर्वांसमोर आणण्याची मागणी या लोकप्रतिनिधींनी केली आहे''. शरद पवार मस्साजोगच्या ग्रामस्थांना म्हणाले, ''मी तुम्हाला एवढंच सांगेन राज्यात एक प्रकारे दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे. कृपा करा आणि त्या दहशतीतून तुम्ही बाहेर पडा. याला आपण सगळ्यांनी मिळून तोंड देऊ. एकदा आपण सगळ्यांनी सामुदायिक प्रयत्न करण्याची भूमिका घेतल्यानंतर आपल्याला कोणीही अडवू शकणार नाही''.

**संतोष देशमुख हत्या प्रकरणावर शरद पवार काय म्हणाले?**

शरद पवार म्हणाले, ''बीड जिल्ह्यात जे काही घडलं ते कोणालाही न पटणारं आणि सहन न होणारं आहे. ज्या तरुण सरपंचाची हत्या झाली आहे त्यांनी गेली १५ वर्षे इथल्या लोकांसाठी भरपूर काम केलं आहे. त्यांनी लोकसेवेचे काम केल्यामुळेच लोकांनी १५ वर्षे त्यांची निवड केली. तो तरुण सरपंच येथील लोकांच्या दैनंदिन सुखदुःखाशी समरूप होणारा होता. वादविवादापासून दूर राहणारा होता. असा हा तरुण कर्तबगार लोकप्रतिनिधी तुमच्या गावात काम करत होता. परंतु, येथील कोणाला तरी दमदाटी झाली आणि त्या प्रकरणी चौकशी करत असताना चौकशी करण्याची भूमिका का घेतली म्हणून बाहेरून कोणीतरी येतो आणि त्यांच्यावर हल्ला करतो. हा हल्ला शेवटी त्यांच्या हत्येपर्यंत जातो हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. राज्य सरकारला व केंद्र सरकारला याची नोंद घ्यावीच लागेल''.

### बंगळुरूजवळ कंटेनर कारवर उलटला

राष्ट्रीय महामार्ग ४८ वर तळकेरेजवळ आल्यानंतर एक अवजड मालवाहू कंटेनर कारवर पलटी झाला. कंटेनर कारवर पलटल्याने या अपघातात कारचा चुराडा झाला. **३ महिन्यांपूर्वीच घेतली होती कार**

चंद्रम इगाप्पागोळ (वय ४६), चंद्रम यांच्या पत्नी धोराबाई (वय ४०) मुलगा गण (वय १६), मुली दिक्षा (वय १०) आणि आर्या (वय ६) तर चंद्रम इगाप्पागोळ यांच्या भावाच्या पत्नी विजयालक्ष्मी (वय ३५) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात इगाप्पागोळ यांचे संपूर्ण कुटुंब मृत्युमुखी पडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. तीन महिन्यांपूर्वीच चंद्रम इगाप्पागोळ यांनी कार घेतली होती. आता या अपघाताची नोंद पोलिसांत झाली असून अधिक तपास केला जात आहे. या अपघात प्रकरणी नेलमंगला वाहतूक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जगावं की मरावं,की जावं हे राज्य सोडून?

तांड्यावरील ज्यांनी विमा भरलाय त्यांची नावं सांगतो. गुट्टे, कुट्टे, होळंबे, कराड, दहिफळे, जयस्वाल बंजारा समाजात जयस्वाल आडनाव कुठून आलं मला काही कळेना? गुट्टे कधी आलं? दहिफळे बंजारा कधी झाले? मला काही कळेना?'', असा सवाल धस यांनी उपस्थित केला. ''आंधळे, मुंडे, लटपटे, चिखलबिडे, केंद्रे... ही आडनाव बंजारा समाजात कधी आले? बंजारा समाजात पाच आडनावंच आहेत. एका गावात चार हजार हेक्टरचा विमा भरला गेलाय. २०२४ वर्षाचा. आमच्या तालुक्यातील लोक दुसऱ्या तालुक्यात विमा कसे काय भरू शकतात? माझ नाव खामगाव चिखलीला आल्यावर कसं जमेल?'', असे धस म्हणाले. ''परळीचा पॅटर्न लवकर लागू करावा म्हणून मोदी, शाहांना भेटणार''

''मला वाटतं नरेंद्र मोदी साहेबांना विनंती करावी लागणार आहे की, पंतप्रधान पीक विमा योजनेत देशातील कोणत्याही सातबाऱ्यावर कोणीही नावे टाकू द्यायची. एकट्या सोनपेठ तालुक्यात १३ हजार १९० हेक्टरचा बोगस पीक विमा भरला गेला आहे. परळीचा हा नवीन पॅटर्न आहे. पंतप्रधान पीक विमा योजनेचा परळी पॅटर्न. हा पॅटर्न सगळीकडे लागू करावा, अशी विनंती मी देशाच्या पंतप्रधानांकडे करणार आहे. लवकरात लवकर वेळ घेतो मी अमित शाहांची आणि पंतप्रधानांची. हा जो परळीचा पॅटर्न आहे, तो सगळ्यात आधी गुजरातमध्ये लागू करावा आणि वाराणसीतही लागू करा अशी विनंती करणार'', असे म्हणत सुरेश धस यांनी नामोल्लेख न करता धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला.

''काय चाललंय? गरीब शेतकरी पैसा भरतोय. आम्हीच घोषणा केली की, १ रुपयात पीक विमा. वाजवा ढोल. घ्या ढोल. एक रुपयात विमा, परळी पॅटर्न. राज्याचे कृषिमंत्री कोण, मला त्यांचं नाव माहिती नाही. मी नाव घेणार नाही. २०२३-२४ चे कृषिमंत्री. २०२३ मध्ये थोडं साधलं. बीड जिल्ह्याचा आकडा सांगितला मी २०२३ चा, ७००० हेक्टरचा. धाराशिव जिल्ह्यात ३००० हेक्टरवर गुन्हे दाखल झाले आहेत'', असे धस यांनी विधानसभेत सांगितले.

''आम्हाला पीओकेमध्ये नेऊन सोडायची तरी सोय करा''

''हे काय चाललंय. धाराशिव जिल्ह्यात भरलेला ३००० हेक्टरचा विमा, सगळे शेतकरी परळी तालुक्यातील आहेत. माझ्या मतदारसंघात कासेवाडी आंबेवाडी गाव आहे. त्या गावाला महसूली दर्जाच नाही, तिथून ४००० हेक्टरचा विमा भरला गेलाय. आपल्या शेजारचे पॅटर्नवाले. परभणी जिल्ह्यातून ४० हजार हेक्टरचा बोगस विमा भरला गेला आहे. आता जगावं की मरावं, की जावं हे राज्य सोडून? आम्हाला पीओकेमध्ये (पाकव्याप्त काश्मीर) नेऊन सोडायची तरी सोय करा'', अशा शब्दात सुरेश धसांनी माजी कृषिमंत्र्यांवर घणाघात केला. सुरेश धस यांनी यावर कारवाई करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

# कोरठणच्या यात्रोत्सवाची तयारी सुरू

## १३ ते १५ जानेवारी दरम्यान यात्रोत्सव | प्रशासकीय बैठक संपन्न



■ पुढील महिन्यात पार पडणाऱ्या कोरठण खंडोबाच्या यात्रोत्सवाची तयारी सुरू झाली असून तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी प्रशासकीय बैठक घेत सुचना दिल्या.

पिंपळगांव रोठा : प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या पिंपळगांव रोठा येथील कोरठण खंडोबाच्या १३ ते १५ जानेवारी दरम्यान पार पडणाऱ्या यात्रोत्सवाची तयारी सुरू झाली असून तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी प्रशासकीय बैठक घेऊन विविध विभागांना सुचना दिल्या.**

दरवर्षी पौष पौर्णिमेला या यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदा सोमवार दि.१३ जानेवारी ते बुधवार दि.१५ जानेवारी दरम्यान तीन दिवस यात्रोत्सव पार पडणार असून लाखो भाविकांची या यात्रोत्सवास हजेरी लागणार आहे. त्या अनुषंगाने विविध विभागांच्या तयारीचा आढावा घेण्यात आला.

या यात्रौत्सवानिमित्त विविध धार्मिक तसेच सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आहे. हा यात्रोत्सव महाराष्ट्रात प्रसिध्द आहे. लाखोंच्या संख्येने तीन दिवसात भाविक हजेरी लावतात. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन तालुकास्तरावरील पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग, बांधकाम विभाग, महावितरण, राज्य उत्पादन शुल्क, राज्य परिवहन महामंडळ, जीवन प्राधिकरण, कृषि विभाग आदी विभागांचे अधिकारी, कर्मचारी बैठकीस उपस्थित होते. त्यांना तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी सुचना दिल्या.

तहसिलदार गायत्री सैंदाणे यांच्याह कोरठण खंडोबा देवस्थानच्या अध्यक्षा शालिनी घुले, उपाध्यक्ष महेश शिरोळे, सचिव चंद्रभान ठुबे, खजिनदार कमलेश घुले, राजेंद्र चौधरी, अजित महांडुळे, तुकाराम जगताप, सुरेश फापाळे, जालिंदर खोसे, महादेव पुंडे, सरपंच सुरेखा वाळुंज, माजी सरपंच अशोक घुले, रामदास मुळे, धोंडीभाऊ जगताप, दिलीप घुले, तुकाराम जगताप, ॲड. संतोष वाळुंज आदी उपस्थित होते.

### देवस्थान समिती व ग्रामस्थांचा सहभाग

कोरठण खंडोबा देवस्थान हे महाराष्ट्रातील लाखो कुटूंबाचे कुलदैवत आहे. दरवर्षी कोरठण गडावर मोठा यात्रोत्सव भरतो. मोठया संख्येने भाविक दर्शनासाठी हजेरी लावतात. प्रशासनाच्या वतीने यात्रौत्सवाची तयारी सुरू करण्यात आली आहे. शासनाच्या विविध विभागांना सुचना देण्यात आल्या असून या नियोजनात देवस्थान समिती व ग्रामस्थांचाही सहभाग आहे.

**गायत्री सैंदाणे**
तहसिलदार

### धार्मिक, सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन

देवस्थान समिती व प्रशासनाच्या वतीने यात्रोत्सवाची तयारी सुरू करण्यात आली आहे. तहसिलदार गायत्री सैंदाणे यांनी विविध विभागांना कोठेही गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्याच्या सुचना दिल्या आहेत. यात्रौत्सवाच्या काळात विविध धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी यात्रोत्सवासाठी मोठया संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा.

**शालिनी घुले**
अध्यक्ष, कोरठण देवस्थान ट्रस्ट

# आदिनाथ ग्रामसंघाचा बेटी बचाव, बेटी पढाओचा नारा!

## नई चेतना राष्ट्रीय जेंडर मोहिमेचे आयोजन

पळवे खुर्द : प्रतिनिधी

**मंगल पळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पळवे खुर्द येथे नई चेतना राष्ट्रीय जेंडर मोहिमेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आदिनाथ महिला ग्रामसंघाच्या वतीने बेटी बचाव, बेटी पढाओचा नारा देण्यात आला.**



■ नई चेतना राष्ट्रीय जेंडर मोहिमेअंतर्गत पळवे खुर्द येथे विशेष कर्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या मोहिमेअंतर्गत पळवे खुर्द गावातून रॅलीचे आयोजन करण्यात येऊन महिला, ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात आले. रॅलीमध्ये घोषवाक्य लिहिलेले फलकही महिलांनी हाती घेतले होते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये मुलीचे महत्व विषद करणारे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुलगा, मुलगी एक समान अशी उपस्थितांना शपथ देण्यात आली.

या अभियानांतर्गत काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये लैंगिक शोषणासबंधी प्रबोधन करण्यात आले. स्त्री पुरूष समानतेविषयी या रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. बेटी बचाव बेटी पढाओ ही योजना सन २०१५ मध्ये हरियाना राज्यातून सुरू झाली. मुलगी शिक्षित झाली तर आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचाराला ती विरोध करेल. ती तिच्या अधिकाराविषयी जागृत होईल. बेटी बचाव बेटी पढाओ या योजनेमागे १ हजार मुलांमागे ७७५ मुलींचे प्रमाण होते. भारतामध्ये मुलींच्या संख्येमध्ये सतत घट होत आहे. मुला मुलींचे प्रमाण सम करणे हा योजनेमागील उद्देश असल्याचे मंगल पळसकर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

या कार्यक्रमास सरपंच सुनिता जाधव, ऋतुजा जाधव, मिना जाधव, जि प शाळेचे मुख्याध्यापक आतार, विविध महिला ग्रामसंघाच्या अध्यक्ष, सचिव, सदस्य उपस्थित होते.

### दिक्षाच्या रांगोळीचे आकर्षण

या कार्यक्रमानिमित्त दिक्षा पळसकर हिने अतिशय सुबक रांगोळी रेखाटली होती. ही रांगोळी या कार्यक्रमाचे आकर्षण ठरली. या रांगोळीचे उपस्थितांनी कौतुक करीत दिक्षा हिच्या कलेचे सर्वांनी कौतुक केले. दिक्षा हिने आदीनाथ महिला ग्रामसंघाला दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद देण्यात आले.

# निघोजमधील बिबट्यांचा बंदोबस्त करा

निघोज : प्रतिनिधी

**कुकडी डाव्या कालव्यामुळे समृध्दी पावलेले निघोज हे गाव सध्या बिबट्यांच्या वास्तव्यामुळे चर्चेत आले असून बिबट्यांचे नित्याचे दर्शन होत असल्याने वन विभागाने बिबटयांचा बंदोबस्त करण्याची मागणी शिवबा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.**



दोन दिवसांपूर्वी निघोजच्या लाळगे मळ्यात बिबट्यांनी शेळया व कुत्र्यांना फस्त केल्याने भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी कुंड परिसरात कोंबडयांच्या खुराडयात अडकलेल्या बिबटयाला जेरबंद करण्यात आले होते. यावरून या परिसरात बिबटयांची संख्या किती आहे याची कल्पना येऊ शकते.

बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उपायोजना न केल्यास शिवबा संघटना आंदोलनाचा पावित्रा घेईल असा इशारा शिवबाचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, बबनराव तनपुरे, राजू लाळगे यांनी दिला आहे. तसे निवेदन वन विभागाला देण्यात आले आहे.

सध्या शेतांमध्ये मोठया प्रमाणावर शेतीची कामे सुरू असून रात्रीचा वीज पुरवठा करण्यात येत असल्याने बिबट्यांच्या भितीने जीव मुठीत धरून पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना जावे लागते. त्यावर उपाय म्हणून दिवसा वीज पुरवठा करण्यात यावा किंवा मागेल त्याला सोलरची यंत्रणा देण्यात यावी अशी मागणी सरकारकडे करणार आहोत असे शिवबाचे अनिल शेटे यांनी सांगितले.

# चुरशीच्या लढतींनी रोखला उपस्थितांचा श्वास!

## किसानच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाला सुरूवात

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहरातील किसान शैक्षणिक संकुलामध्ये आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवामध्ये पाहिल्याच दिवशी पार पडलेल्या विविध स्पर्धांमधील चुरशीच्या लढतींनी उपस्थितांचा श्वास रोखला ! खेळाडूंच्या चमकदार कामगिरीचे कौतुक करीत अनेक पालकांनी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली.**



किसानच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाला शनिवारी सकाळी किसान समुहाचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे, प्राचार्य मनोज राठोड, संचालिका आशा चेडे, युवा उद्योजक ऋषिकेश चेडे, अविनाश सोमवंशी, सोनिया गुंजाळ, वैशाली भगत, तनुजा कावरे, विद्यार्थी, शिक्षकांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात प्रारंभ झाला. चंद्रकांत चेडे यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना शुभेच्छा देत खिलाडू वृत्तीने खेळण्याचे आवाहन केले.

तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य दाखविणाऱ्या खेळाडूंना बुधवारी पार पडणाऱ्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात सन्मानीत करण्यात येणार आहे.

महोत्सवाच्या उद्घाटनानंतर दिवसभर खो-खो, कबड्डी, हर्डल्स, लांब उडी अशा चुरशीच्या स्पर्धा पार पडल्या. प्रत्येक खेळाडून प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करताना दिसत होता. एकमेकांवर वर्चस्व मिळविण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावणाऱ्या खेळाडूंच्या जिद्दीचे उपस्थित पालकांनी कौतुक केले. स्पर्धेत विजय संपादन केलेल्या खेळाडूंच्या चेहऱ्यावरील आनंद इतरांना प्रोत्साहन देणारा होता. विविध स्पर्धांचा आनंद घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक तसेच हौशी नागरीकांनीही किसानच्या मैदानावर दिवसभर हजेरी लावली होती. रविवार व सोमवारी या स्पर्धा होणार असून दोन्ही दिवस चुरशीच्या लढती अपेक्षीत आहेत.

# सुजित पाटलांनी लावला धोत्र्याचा वीज प्रश्न मार्गी!

## ९० पोलची लाईन पुर्णत्वास | ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण

धोत्रे : प्रतिनिधी

**गेल्या अनेक वर्षांपासून धोत्रे व परिसराला भेडसावणारी वीजेची समस्या अखेर दूर झाली आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या प्रयत्नांतून टाकळी ढोकेश्वर ते धोत्रे या ९० पोलच्या लाईनचे काम पुर्ण झाले असून हा प्रश्न आता मार्गी लागल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाची वातावरण आहे.**



■ धोत्रे गावाचा वीजेचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर सुजित झावरे यांनी ग्रामस्थांसह वीज केंद्रास भेट देत कामाची पाहणी केली.

वीजेची समस्या दुर करण्यासंदर्भात धोत्रे येथील ग्रामस्थांनी सुजित झावरे पाटील यांच्याकडे तीन वर्षांपूर्वी मागणी केली होती. या मागणीची दखल घेऊन झावरे पाटील यांनी तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा करत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून आरडीएसएस योजनेअंतर्गत टाकळी ढोकेश्वर ते धोत्रे हे ९० पोलच्या लाईनचे काम हाती घेण्यात आले होते. या कामासाठी जिल्हा नियोजन मंडळामार्फत मंत्री राधाकृष्ण विखे यांनी एक कोटी रूपयांचा निधी मंजुर केला होता.

हे काम मार्गी लावण्यासाठी सुजित झावरे पाटील यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून हा प्रश्न माग लावल्याबद्दल धोत्रे ग्रामस्थांच्या वतीने त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या बांधिलकीचे कौतुक केले.

काम पुर्ण झाल्यानंतर सुजित झावरे पाटील यांनी जालिंदर भांड, विनायक भांड, कुंडलिक भांड, पंढरीनाथ तागड, शेखर भांड, शरद गवते, नामदेव भांड, दिलीप गवते, जगन्नाथ बनसोडे, संदीप भांड, भाऊसाहेब राहिंज यांच्यासह ग्रामस्थांनी वीज केंद्रास भेट देत कामाची पाहणी केली.

### तीन गावांच्या वीजेचा प्रश्न मार्गी

निधी मंजुरीनंतर काम सुरू होऊन ९० पोलच्या लाईनचे काम नुकतेच पुर्ण होऊन वीजेची जोडणीही देण्यात आली. त्यामुळे काकणेवाडी, ढोकी या गावांच्या वीजेवरील अतिरिक्त भार पुर्णतः कमी होऊन धोत्रे गावासह काकणेवाडी व धोत्रे या गावांच्या वीजेचा प्रश्न कायमचा मार्गी लागला आहे.

# विखे पाटलांमुळे जिल्ह्याच्या विकासाला गती

## सचिन पाटील वराळ यांचे मत



निघोज : प्रतिनिधी

**मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्याचा परिपूर्ण विकास केला. जिल्हा विकासाला गती देण्याचे काम विखे पाटील यांनी केले म्हणून सातव्यांदा मंत्रीपदाची संधी त्यांना मिळाली असल्याचे प्रतिपादन संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी व्यक्त केले.**

वराळ पाटील यांनी मंत्री विखे पाटील यांचा नागपूर येथे जाऊन सत्कार केला यावेळी ते बोलत होते . गेली पन्नास ते साठ वर्षांपासून विखे कुटुंबाने पारनेर सहीत जिल्ह्यातील प्रत्येक गावचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. विखे कुटुंबाचा सर्वसामान्य जनतेला मोठा आधार आहे. आरोग्य शिक्षण यामध्ये सर्वसामान्य जनतेच्या कल्याणार्थ विखे कुटुंबाने राज्यातील लाखो कुटुंबांचे कल्याण केले आहे. मंत्रीपदाच्या माध्यमातून विखे पाटील यांना राज्याचा विकास करण्याची संधी मिळाली असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

# वेशीच्या नूतनीकरणास बबन कवाद यांचा आक्षेप

## पुरातत्व विभागाचे वेधले लक्ष | पुरातत्व विभागाकडून नूतनीकरणास हरकत

निघोज : प्रतिनिधी

**निघोजच्या सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी एकत्र येत लोकसहभागातून वेशीचे नूतनीकरण करण्याच्या घेतलेल्या निर्णयास सामाजिक कार्यकर्ते बबन कवाद यांनी आक्षेप घेतला आहे. नुतनीकरणासंदर्भात कवाद यांनी नाशिकच्या पुरातत्व विभागाचे लक्ष वेधल्यानंतर पुरातत्व विभागाने निघोज ग्रामपंचायतीस पत्र पाठवून वेस तसेच बारवेच्या नूतनीकरणास हरकत घेतली आहे.**

पुरातत्व विभागाच्या वतीने ग्रामपंचायतीस पाठविण्यात आलेल्या पत्रामध्ये नमुद करण्यात आले आहे की, निघोज येथे प्राचीन काळातील बारव व वेस असून या ठिकाणी नुतनीकरणाच्या नावाखाली बारव व वेस या वास्तूंना धोका निर्माण केला जात आहे. बारव आणि वेस पाडून नवीन तयार करण्याचे विचाराधीन आहे. त्यावर बबन कवाद यांनी दि.१३ डिसेंबर रोजी हरकत घेत पुरातत्व विभागाकडे तक्रार करण्यात आली आहे.



### हानी पोहचल्यास कारवाई

सदर वास्तूंचे जतन व संवर्धनाकरीता पुरातत्व विभागाचे मार्गदर्शन घ्यावे. या वास्तूंना हानी पोहचल्यास महाराष्ट्र प्राचीन स्मारके, पुराणवास्तूशास्त्र विषयक स्थळे अवशेष व अधिनियम १९६० व नियम १९६१ व १९८२ च्या परिपत्रकान्वये संबंधितांवर योग्य कारवाई करण्यात येईल असा इशारा या पत्रात देण्यात येईल.

### धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घ्या

निघोज येथील प्राचीन काळातील बारव व वेस राज्य संरक्षित स्मारक नसली तरीही त्याची निगा राखणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे या वास्तूंना कोणताही धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**अ.ना.गोटे**
सहाय्यक संचालक पुरातत्व विभाग, नाशिक

### प्राथमिक व नैतिक जबाबदारी

महाराष्ट्र शासनाच्या दि.१० सप्टेंबर १९८२ च्या परिपत्रकान्वये राज्य संरक्षित तथा असंरक्षित स्मारक जतन करण्याबाबत नियमन करण्यात येते. त्यानुसार आपल्या गावातील ऐतिहासिक बारव व वेस या वास्तूंची निगा राखणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. तथापी ऐतिहासिक ठेव्याचे योग्य पध्दतीने जतन व संवर्धन करण्याची आपली सर्वांची प्राथमिक व नैतिक जबाबदारी आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com